भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०१/२०१८

**१) शेतातील धानाच्या पोते तणसीचे ढिगात चोरीचे मिळुन आल्याने गुन्हा नोंद . . :–**

दिनांक ०२/०१/२०१८ ते ०३/०१/२०१८ चे ०६.०० यातील फिर्यादी महेश गवठु गराडे वय ३० वर्ष, रा. मांडेसर याने आपले शेतात धानाचा चुरणा करुन ९० पोते धाना मधुन अक्षय, जयश्रीराम, १००८, जातीचे १५ पोते धान वजन १२ क्विंटल किंमती ३०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीने आजुबाजुचे शेतात शोध घेतला असता नमुद आरोपींचे शेतात तणसीचे ढिगात वरील जातीचे १ क्विटंल ५० किलो धान दिसुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास निरगुडे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) म.रा.वि.वी कंपनीचे ट्रान्सफार्मचे फ्युिज चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २८/१२/२०१७ चे १०.०० ते ०३/०१/२०१८ चे १०.०० वाजता. पर्यत यातील म.रा.वि.वी.कंपनीचे पंचायत समिती मोहाडी जवळील ट्रान्सफार्मर चे फ्युिज ३ नग, मोहाडी खरेदी विक्री जवळील ट्रान्सफार्मर चे फ्युिज ३ नग, एकुण १२ नग किंमती ६००/–रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने व महावितरण कंपनीचे नुकसान केल्याने फिर्यादी विनोद मनोहर मस्के वय ३५ वर्ष, रा. नेहरु वार्ड मोहाडी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकाने पायी महिलेला धडक देवुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/०१/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन सत्यभामा श्रावण मेश्राम वय ६५ वर्ष, रा. बारव्हा ही पायी जात असता हीला चिकना बस स्थानक येथे धडक मारुन गंभिर जखमी करुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पो. शि. ठोंबरे यांचे चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) विहीरीच्या पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ३०/१२/२०१७ चे १३.०० ते ०३/०१/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील मृतक रोशन मानिकलाल देशमुख वय २८ वर्ष, रा. स्टेशन टोली देव्हाळी हा स्वत: शेतावरील विहीरीतील पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी मानिकलाल कवळुजी देशमुख वय ६० वर्ष, रा. स्टेशनटोली देव्हाळी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खैरकर पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**५) औषधोदरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २२/१२/२०१७ चे १४.४० वाजता दरम्यान यातील मृतक बिसन झोलु खुने वय ५० वर्ष, रा. सक्करदरा याचे पोटात दुखत असल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पो. स्टे. ला सरतर्फे फिर्यादी पोहवा. बिनझाोडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**६) वैनगंगा नदीचे पात्रात अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले. :–**

दिनांक ०३/०१/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील अनोळखी ईसम वय अंदाजे ५० ते ५५ वर्ष, रा. वयोगटातील वैनगंगा नदीचे पात्रातील पाण्यात तरंगतांना दिसल्याने फिर्यादी सौ. शालु शामराव शेन्द्रागडे वय २९ वर्ष, रा. कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**७) गळफास लावुन महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०३/०१/२०१८ चे ०५.०० वाजता पुर्वी यातील मृतक श्रीमती छाया उर्फ संगीता छगन मते वय ४० वर्ष, रा. लाखोरी हिचा पती मागील ६ महीण्या पुर्वी मरण पावला असुन तेव्हा पासुन वडीलो पार्जीत शेती यातील मृतक करीत होती मागील वर्षी तिने शेती करीता कोऑपरेटीव्ह बॅक शाखा लाखनी येथुन कर्ज घेतले होते तीला शेतातुन समाधान कारक उत्पन्न व शेतावरील कृषी पंपाचे विज बिल थकीत असल्याने यातील मृतकने स्वत:चे घरी गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी गिरीधर मनोहर मते वय ३५ वर्ष, रा. लाखोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आडे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**८) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०३/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन पवनी व अडयाळ येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू किंमती १५००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/१२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ३४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीनं सिटर वाहनांवरती– ०८ केसेस व ईतर वाहनांवरती –२६ केसेस करण्यात आले आहे.

04.12.18

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.